## जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, बुलडाणा.
## तलाठी या संवर्गातील रिक्त पदे भरावयाची मोहीम
## <u>जाहिरात</u>
**दिनांक :- २९ जुन, २०११**

जिल्हाधिकारी बुलडाणा यांच्या अधिपत्याखालील उपविभागीय अधिकारी बुलडाणा, मेहकर, खामगांव, मलकापूर व जळगांव जामोद यांच्या आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील रिक्त पदांसाठी खाली नमूद केलेल्या प्रवर्गातील उमेदवारांकडून दिनांक **११** जुलै**, २०११** पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**तलाठी (वर्ग-३) वेतन श्रेणी PB-१ रू. ५२००-२०२०० (ग्रेड पे रु.२४००/-)**

| अ. क्र. | जातीचा प्रवर्ग | एकुण पदे | प्रवर्ग निहाय समांतर आरक्षण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | अंशका-लीन | अपंग (कर्णबधीर) | सर्वसाधारण |
| १ | अनुसूचित जाती | ४ | १ | १ | ० | ० | २ |
| २ | अनुसूचित जमाती | ६ | २ | १ | १ | ० | २ |
| ३ | विमुक्त जाती-अ | १ | ० | ० | ० | ० | १ |
| ४ | भटक्या जमाती-ब | १ | ० | ० | ० | ० | १ |
| ५ | भटक्या जमाती-क | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जमाती-ड | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | विमाप्र | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | इमाव | ५ | १ | १ | ० | ० | ३ |
| ९ | खुला | ९ | ३ | १ | १ | १ | ३ |
| | **एकुण** | **२६** | **७** | **४** | **२** | **१** | **१२** |

### १) तलाठी पदांसाठी आवश्यक किमान शैक्षणिक पात्रता :-

१) शासन महसूल व वन विभाग, अधिसुचना दि. १ जुलै २०१० अन्वये संविधानिक विद्यापीठाची पदवी किंवा शासनाने पदवीशी समतुल्य म्हणुन जाहीर केलेली अन्य अर्हता.

२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्रक्र/६१/२००१/३९ दिनांक १९ मार्च २००३ मधील सुचनेनुसार नियुक्त होणाऱ्या सर्व उमेदवारांना शासन मान्य संस्थेचा संगणक प्रशिक्षण कोर्स (MS-CIT) नियुक्तीपासून दोन वर्षात आत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

### २) निवड प्रक्रिया कार्यक्रम :-

| | | | |
|---|---|---|---|
| **१)** | **११ जुलै २०११** | **:-** | **आवेदनपत्र स्विकारण्याची अंतिम तारीख.** |
| **२)** | **१९ जुलै २०११** | **:-** | **प्राप्त अर्जामधील पात्र व अपात्र अर्जांची यादी प्रसिध्द करणे** |
| **३)** | **२० जुलै २०११** | **:-** | **अपात्र अर्जावर आक्षेप नोंदविण्याची अंतिम तारीख** |
| **३)** | **२२ जुलै २०११** | **:-** | **पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र पाठविण्यांचा दिनांक** |
| **४)** | **३१ जुलै २०११** | **:-** | **लेखी परीक्षा.** |
| **५)** | **०६ ऑगस्ट २०११** | **:-** | **लेखी परीक्षेचा निकाल जाहिर करणे व अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे.** |

**<u>सर्वसाधारण अटी</u> :-**

१. सदर पदासाठी उमेदवारांचे वय दिनांक **३० जुन, २०११** रोजी किमान १८ वर्षे आवश्यक असून कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३३ वर्ष व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्ष राहील.

२. १)खेळाडू उमेदवारांसाठी वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथील राहील.

२)माजी सैनिक उमेदवारांसाठी वयाची अट ४५ वर्षापर्यंत राहील.

३) १९९१ चे जनगणना कर्मचारी / स्वातंत्र्यसैनिकाचे पाल्य / १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी उमेदवारासाठी शासन निर्णय दिनांक ०६.१०.२०१० नुसार ४५ वर्ष वयाची अट राहील.

४) अंशकालीन उमेदवारांसाठी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २७.१०.२००९ मधिल तरतूदीनूसार ४६ वर्षे वयाची अट राहील.

३ शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा ४ दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना (DCPS) लागू राहील.

अ) **खेळाडू उमेदवारांकरीता :-**

१) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक/रिक्रिधो/२००२/प्र.क्र.६८/प्रीयुसे-२, दि. ३०/४/२००५ मधील तरतुदी नुसार राहील. अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडूसाठी त्यांची गुणवता व पात्रता विचारात घेवून उच्च वयोमर्यादेत पाच वर्षापर्यंत शिथील राहील. गट-क पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघीक किंवा क्रिडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिक्य पद स्पर्धेत प्रथम,व्दीतीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू असावा. राज्य अजिक्य पद स्पर्धा या सदर खेळाच्या महाराष्ट्र ऑलंपिक असोसियेशनची असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केल्ल्या असाव्या अथवा महाराष्ट्र ऑलिंपीक असोसियेशनने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात. तसेच ज्या खेळाची नोंदणीकृत राज्य संघटना त्यांच्या अधिकृत राष्ट्रीय संघटनेशी संलग्न असेल, तसेच राष्ट्रीय संघटनेला इंडियन ऑलिपीक असोसिएशनने संलग्नता दिलेली असल्यास अशा राज्य संघटनेच्या स्पर्धेतील राज्य स्तरीय विजेत्यांनाही खेळाडूच्या आरक्षणाचा लाभ देण्यात येईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रितरित्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही.

२) खुल्या प्रवर्गातील **उन्नत आणि प्रगत कुटुंबातील** व्यक्तींना (क्रिमिलेअर) खेळाडूंसाठी असलेले ५%आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) याप्रवर्गातील **उन्नत आणि प्रगत खेळाडू** उमेदवारांना खेळाडूचे ५% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

३) **खेळाडू प्रमाणपत्राची वैधता** झाल्याशिवाय खेळाडूंना नियुक्ती देण्यात येणार नाही.

ब) **माजी सैनिक उमेदवारांकरीता**

१) माजी सैनिक म्हणून शासन सेवेकरीता पात्र उमेदवार.

२) माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही.

क) **महिला उमेदवारांकरीता, शासन निर्णय दिनांक २५ मे २००१ नुसार.**

१) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत कुटुंबातील (क्रिमिलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३०% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच इतर मागासवर्गीय, विजाअ, भजब, भजक आणि भजड या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला उमेदवारांना महिलांचे ३०% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

२) शासन निर्णय दिनांक २५ मे २००१ नुसार पुरेशा प्रमाणात महिला उपलब्ध न झाल्यास इतरत्र अदलाबदल न करता त्याच प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधुन महिलांसांठी राखीव असलेली पदे भरण्यात येतील.

ड) **अंशकालीन कर्मचारी उमेदवाराकरीता शासन निर्णय दिनांक २७.१०.२००९ नुसार**

१) शासन निर्णय दिनांक २७.१०.२००९ नुसार अंशकालीन कर्मचारी उमेदवारांना १० टक्के आरक्षण विहीत केलेले आहे.

२) अंशकालीन कर्मचारी उमेदवारांनी अर्जासोबत सहाय्यक संचालक रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र यांचे अंशकालीन कर्मचारी असल्याचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच ज्या कार्यालयात त्यांनी अंशकालीन कर्मचारी म्हणुन काम केले आहे त्या कार्यालय प्रमुखाचे अंशकालीन कर्मचारी असल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

**ई) इतर अटी व शर्ती**

१. उमेदवारांना मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे अनिवार्य आहे.

२ अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी (Domicile)असला पाहीजे.

३ अर्जदाराने अर्जासोबत पदासाठी आवश्यक अर्हतेनूसार शैक्षणिक प्रमाणपत्रे, संगणक, जातीचे प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र नॉनक्रीमीलेअर प्रमाणपत्र इत्यादीच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात. **( मुळ प्रती जोडू नये )**

४ उमेदवारांने जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाचे नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी.

५. शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभाग प्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडवी.

६ उमेदवाराने आपले अर्ज **अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, बुलडाणा.** या पत्त्यावर दिनांक **११ जुलै २०११** पर्यंत किंवा त्यापूर्वी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठवावेत किंवा कार्यालयीन वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात प्रत्यक्ष सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत. अर्जाची पोच न चुकता घ्यावी. पोष्टाद्वारे दिनांक **११ जुलै २०११** नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. त्याबाबत कोणत्याही तक्रारी मान्य केल्या जाणार नाहीत.

७ आवश्यक शैक्षणिक पात्रता परिपूर्ण नसलेले/अपूर्ण/आवश्यक प्रमाणपत्र सोबत नसलेले /अर्जासोबत आवश्यक रकमेचा डि.डी.नसलेले /अर्जावर स्वत:चा फोटो नसलेले/चुकीचे भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेण्यात येणार नाही. अथवा कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. त्यासाठी सर्व जबाबदारी अर्जदार यांची राहील.

८. जाहिरातीमधील प्रसिध्द केलेल्या अर्जाच्या विहित नमुन्यावर अलीकडील काढण्यात आलेला पासपोर्ट साईजचा फोटो चिकटवून **राजपत्रीत अधिकाऱ्यांनी साक्षांकित (Attested) केलेला असावा.** फोटो साक्षांकित (Attested) केलेला नसल्यास अर्ज रद्द करण्यात येईल.

९. अर्जदाराला लेखी परिक्षेसाठी उपस्थित राहण्याकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहाणार नाही.

१०. फक्त याच जाहिरातीला अनूसरुन ज्या उमेदवारांची अर्ज विहित कालावधीत प्राप्त होतील. केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

११. प्रत्येक अर्जदाराने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना भरून अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

१२. शासन निर्णय दिनांक १९/१०/२००७ मधील परिच्छेद क्रमांक ५(४) नुसार २०० गुणांची लेखी परिक्षा राहील. लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ५० गुण ठेवण्यात आले असुन एकुण २०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. या परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील. जिल्हास्तरीय पदांसाठी निवड होणा-या उमेदवारांना बुलडाणा जिल्हयाचा भुगोल, सामाजिक इतिहास, व हवामान इत्यादी स्थानिक बाबींची माहिती असणे आवश्यक आहे.

१३. मागासवर्गीय उमेदवारांना **जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नियुक्ती देण्यात येणार नाही**.

१४ जातीचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडावी तसेच उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) चे तत्व अनु.जाती/ अनु.जमाती व्यक्तिरीक्त इतर सर्व मागास प्रवर्गास लागू असल्याने उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०११-१२ या वित्तीय वर्षातील **दिनांक १ एप्रिल-२०११ ते ३१ मार्च २०१२ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी.**

१५. आरक्षणाच्या मागासवर्गीय पदांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

१६. वर नमुद रिक्त पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.

१७. सदर पदाकरिता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रू.१५०/- (अक्षरी एकशे पन्नास रूपये) व मागासवर्गीय उमेदवारांनी रू.७५/- (अक्षरी पंच्याहत्तर रूपये फक्त ) चा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी.अर्जासोबत जोडणे आवश्यक राही. अन्यथा अर्ज रद्द करण्यात येईल. नंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. **माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही.**

१८. सदर डिमांड ड्राफ्ट (डी.डी.) **अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, बुलडाणा** या नावांने असणे आवश्यक राहील. **डी.डी.** या नावांने नसल्यास किंवा अपुर्ण नावांने असला तर अर्ज रद्द करण्यात येईल व त्याची संपुर्ण जबाबदारी अर्जदाराची राहील, कृपया या बाबतची नोंद घेण्यात यावी.

१९ उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमुन्यात A4 आकाराच्या कागदावर अर्ज करावा. उमेदवाराची अर्जातील माहिती/तपशिल सुस्पष्ट नमूद करावी. प्रमाणपत्राच्या मुळ प्रती जोडू नये छायांकीत साक्षांकन केलेल्या प्रती जोडाव्यात

२० महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.१/०१/२०१० नुसार तलाठी या पदासाठी निवड करतांना मुलाखत न घेता फक्त लेखी परीक्षा घेण्यात येईल. व लेखी परीक्षेमध्ये प्राप्त झालेल्या गुणाच्या आधारावर गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

२१. अतिरीक्त संवर्ग कक्षाकडून उमेदवार प्राप्त झाल्यास वरील पदामध्ये बदल होऊ शकतो.

२२ सदरच्या कार्यक्रमामध्ये बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार जिल्हा निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

२३. सदर जाहिरात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या www.buldhana.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली आहे. भरती संदर्भात वेळोवेळी होणारे बदल किंवा सुचना याच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : बुलडाणा**
**दिनांक : २९ जुन ,२०११**

**स्वा/-**
**(बी.जी.वाघ)**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती,**
**तथा जिल्हाधिकारी, बुलडाणा**